सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

गृहव्यवस्थापन विभाग

जावक क्रमांक : गृव्य./ऑफलाइन-शुद्धीपत्रक-२/२०२६/१३४४ **दिनांक : ०३/११/२०२६**

शुद्धीपत्रक क्रमांक ०२

ऑफलाइन स्वारस्य अभिव्यक्ती आवेदन दुसरी मुदतवाढ सूचना

संदर्भ :

१. संक्षिप्त वृत्तपत्र जाहिरात क्रमांक ३१, प्रसिद्धी दिनांक ११ ऑक्टोबर २०२६

२. मूळ आवेदन जावक क्रमांक : गृव्य./१२२६/२०२६, दिनांक ११ ऑक्टोबर २०२६

३. शुद्धीपत्रक क्रमांक ०१ जावक क्र. गृव्य./ऑफलाइन-शुद्धीपत्रक/२०२६/१२९९, दिनांक २७/१०/२०२६

४. संबंधित ऑफलाइन आस्थापना :

- विद्यार्थी व्यवसाय केंद्र – फोटोकॉपी, प्रिंटिंग, स्कॅनिंग व इतर (दिव्यांग व तृतीयपंथी आरक्षित)
- लॉन्ड्री सेवा केंद्र – विद्यार्थी व्यवसाय केंद्रातील १०० चौरस फूट जागा
- दुचाकी वाहन दुरुस्ती व देखभाल केंद्र – विद्यार्थी व्यवसाय केंद्राशेजारील २०० चौरस फूट जागा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील उपरोक्त ३ सेवा आस्थापना चालविण्याकरिता बंद लिफाफा पद्धतीने मागविण्यात आलेल्या ऑफलाइन निविदा / स्वारस्य अभिव्यक्ती आवेदनांना प्राप्त आदेशानुसार व प्रशासकीय कारणास्तव दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार ऑफलाइन विक्री व स्वीकृतीचे सुधारित वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील :

अ.क्र	निविदा टप्पा / तपशील	मागील मुदत	**सुधारित मुदत (२ री मुदतवाढ)**
१	निविदा / आवेदन संच विक्री समाप्त तारीख	०३/११/२०२६ (दुपारी १५:०० वा.)	**१६/११/२०२६ (दुपारी १५:०० वाजेपर्यंत)**
२	निविदा / आवेदन सादर करण्याची अंतिम तारीख	०३/११/२०२६ (दुपारी १५:०० वा.)	**१६/११/२०२६ (दुपारी १५:०० वाजेपर्यंत)**
३	तांत्रिक लिफाफे उघडण्याची तारीख व वेळ	०४/११/२०२६ (दुपारी १५:०० वा.)	**१८/११/२०२६ (दुपारी १५:०० वाजता) (शक्य झाल्यास)**
४	आर्थिक लिफाफे उघडण्याची तारीख व वेळ	नंतर कळविण्यात येईल	पात्र अर्जदारांना स्वतंत्रपणे कळविले जाईल

महत्त्वाच्या सूचना (अर्जदारांसाठी / निविदाकारांसाठी) :

१. निविदा / आवेदन कोरे संच कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी १५:०० वाजेपर्यंत विभागात उपलब्ध राहतील.

२. ज्या अर्जदारांनी / निविदाकारांनी यापूर्वी आपले सीलबंद अर्ज जमा केले आहेत, त्यांचे अर्ज सुरक्षित व ग्राह्य धरले जातील.

३. मूळ निविदा व आवेदन दस्तऐवजातील सर्व अटी व शर्ती पूर्ववत कायम राहतील.

उपकुलसचिव